# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 02.10.2025 वार- गुरुवार

---

**<u>प्रतापराव</u>**

महात्मा गांधी यांचे आदर्श आणि मूल्ये समाजामध्ये रुजवणे गरजेचं आहे. महात्मा गांधी हे जगभरात सत्य, शांती, अहिंसा आणि दृढ निश्चय यासाठी ओळखले असून त्यांचं संपूर्ण आयुष्यच प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देणारं आहे. असं प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज पुण्यात केलं.आयुष मंत्रालयाच्या वतीनं नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी संस्थेमध्ये जाधव यांच्या हस्ते 'महात्मा गांधी वेबथॉन ' या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. यावेळी विविध अधिकारी आणि विद्यार्थ्यांशी जाधव यांनी संवाद साधला.

**<u>स्वच्छता-ही-सेवा–२०२५</u>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त सुरू असलेल्या ‘स्वच्छता ही सेवा – २०२५’ पंधरवड्याअंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं स्वच्छता सेवकांच्या आरोग्य आणि सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून थेरगाव इथल्या स्वर्गीय शंकरराव गावडे कामगार भवन इंथ ‘सफाई मित्र सुरक्षा शिबिर’ उत्साहात पार पडलं. या शिबिरात थेरगाव, तालेरा, आणि वायसीएम रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी स्वच्छता सेवकांची २ हजारांहून अधिक सफाई सेवकांची मोफत आरोग्य तपासणी केली आणि औषधांचं वितरणही करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

**<u>ऊस गाळप परवाने</u>**

राज्यात गतवर्षी 2024-25 हंगामात 200 साखर कारखान्यांनी ऊस गाळप केलं. राज्यात आतापर्यंत प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयस्तरावर 104 सहकारी आणि 107 खासगी मिळून एकंदर 211 साखर कारखान्यांनी ऊस गाळप परवाने मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळं गतवर्षीपेक्षा यंदा अधिक कारखाने सुरू होण्याची अपेक्षा आहे. गाळप हंगामाचे धोरण निश्चितीनुसार योग्य त्या रकमा भरलेल्या तसंच परिपूर्ण प्रस्ताव असलेल्या साखर कारखान्यांना गाळप परवाने वितरित करण्यात येतील. अशी माहिती पुण्याचे साखर आयुक्त दीपक तावरे यांनी दिली . गतवर्षीचाच्या मध्ये सरासरी ऊस गाळपाचे 85 दिवसांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंगामातील उपलब्ध उसाची स्थिती तुलनात्मकदृष्ट्या अधिक असल्यानं सरासरी 100 ते 110 दिवस हंगाम राहण्याची अपेक्षा वर्तविण्यात येत आहे.

**<u>चंद्रकांत पुलकुंडवार</u>**

पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी 1 नोव्हेंबर 2025 च्या पात्रतेवर आधारित नव्यानं मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला असून मतदार नोंदणीची सुरुवात झाली आहे, याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले. ते म्हणाले ... बाईट- आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार - ३४ सेक

**<u>ई-लिलाव</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला आणि बालकल्याण योजने अंतर्गत मौजे आकुर्डी इथल्या खाद्यपदार्थ केंद्रातील गाळे महिला बचत गटांना भाड्याने देण्यासाठी ई-लिलावाचं आयोजन करण्यात आलं. या लिलावात तब्बल ९७ महिला बचत गटांनी सहभाग घेतला.लिलावात एकूण ४९ गाळे उपलब्ध होते, त्यापैकी दिव्यांग, तृतीयपंथी, कोविड योद्धा आणि आदिवासी महिला बचत गटांसाठी विशेष आरक्षण ठेवण्यात आलं, तर पीसीएमसी सक्षमा अंतर्गत नोंदणीकृत गटांसाठी ४० गाळे राखीव ठेवण्यात आले. या गाळ्यांसाठी १५ हजार १ शे रुपयांपासून पासून ३२ हजार रुपयांपर्यन्त बोली लावण्यात आली. महिला बचत गटांसाठी आयोजित केलेला हा देशातील पहिलाच ई-लिलाव ठरला आहे.

**<u>मुलींच्या जन्म संख्येत वाढ</u>**

पुणे शहरात नवरात्रादरम्यान ५शे पेक्षा जास्त मुलींचा जन्म झाला आहे. यामध्ये सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये ८६ मुलींचा तर औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये ८ मुलींचा जन्म झाला आहे. ही माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या सहायक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक यांनी दिली. अनेक कुटुंबांकडून आपल्या कन्येला देवीची नावं देण्यात आली आहेत.

पुणे महापालिकेनं अपात्र ठेकेदारांना पात्र केल्याचा आरोप आपला पुणे परिसर संस्थेने केला आहे. पुणे शहरासाठी अत्यंत प्रतिष्ठेची असणारी पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ स्पर्धेसाठी शहरातील विविध रस्त्यांची १४५ कोटींची कामं करण्यात येणार आहेत. यासाठी ठेकेदाराचा स्वतःच्या मालकीचा ऑटोमेटेड प्लांट असण्याची अट आहे.  दोन ठेकेदारांनी अन्य मालकीच्या प्लांट सोबतचे करारनामे जोडले असूनही त्यांना पात्र ठरवल्याचा आरोप संस्थेनं केला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज  सकाळ पासून आकाश ढगाळ असून कमाल तापमान २९ तर किमान तापमान १९ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं आहे. उद्याही यांच स्वरूपाचा तापमान राहण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार**